# मेट्रो-३च्या वतीने मॅस्कॉट, जिंगल स्पर्धा

मुंबई : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसी) वतीने मुंबई मेट्रो-३ साठी मॅस्कॉट आणि जिंगल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून, १ जून ते ३० जून २०२३ या कालावधीत एमएमआरसीच्या www.mmrcl.com या अधिकृत संकेतस्थळावर स्पर्धक प्रवेशिका दाखल करू शकतील. स्पर्धेसंबंधी तपशीलवार नियमावली संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दोन्ही स्पर्धेचे निकाल एमएमआरसीच्या अधिकृत समाज माध्यम खाते, तसेच संकेतस्थळावर जाहीर केले जातील. सर्व नागरिकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.